नियमीत फौ. ख.क्र. ०८/२०१७
सरकार विरुध्द आजिनाथ वगैरे
निशाणी क्र. ८९

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (०२) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

माझे नांवः– सुर्यभान विठोबा खेडकर
वय सुमारेः– ७३ वर्ष, व्यवसायः–शेती
निवासस्थानः– मुंगुसवाडे ता. पाथर्डी जि. अहमदनगर

## सर तपासणी

## अभियोग पक्षाकरिता श्री. एस. एस. दराडे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

घटना दि. २५.१०.२०१६ रोजी रात्री ८.०० चे सुमारास, मुंगुसवाडे ते एकनाथवाडी जाणारे रोडवरील कमानीजवळ घडली. घटनेवेळी मी घरी होतो. घटनेवेळी माझा मुलगा सोमनाथ गावात देवदर्शनासाठी गेला होता. मुलगा बराच वेळ घरी आला नाही म्हणून आम्ही गावात गेलो. आम्हाला कलमा ऐकू आला. म्हणून मी व माझी पत्नी कमाणीजवळ गेलो. कमाणीजवळ सोमनाथ व आरोपी आजिनाथ होते. ते एकमेकांना शिवीगाळ करत होते. आरोपी आजिनाथ याने दारु पिवून सोमनाथ याला शिवीगाळ व हाणमार करत होता. आजिनाथच्या हातात लोखंडी गज होता. आम्ही आजिनाथला समजावून सांगण्यासाठी गेलो. त्यावेळी आरोपी क्र. २ ते ७ त्या ठिकाणी शिवीगाळ करत आले. आम्ही त्यांना पुन्हा समजावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी निवृत्ती याने माझ्या पत्नीच्या केसाला धरले. त्यावेळी आजिनाथ याने गजाने माझी पत्नी सुलाबाई हिला मारले. त्यानंतर मी सोडवायला गेलो. त्यावेळी मला निवृत्ती आणि सुर्यभान यांनी गचांडी धरुन खाली पाडले. त्यानंतर सुधाकर दिनकर खेडकर त्या ठिकाणी सोडवायाला आला त्यावेळी आरोपी आजिनाथ याने जिवे मारु अशी धमकी दिली. तसेच सदर मारहाणीमध्ये द्रोपदी, सुनिता यांनी माझी पत्नी सुलाबाइ हिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर मी व माझी पत्नी पाथर्डी पोलिस स्टेशनला आलो व त्यानंतर सरकारी दवाखान्यात गेलो. सरकारी दवाखान्यामध्ये उपचार घेतले. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी आरोपी क्र. १ ते ४ व ७ न्यायालयात हजर आहेत. ज्या गजाने आम्हाला मारहाण केली तो दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला गज आर्टीकल अ दाखविला. तो तोच आहे. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता.

सरतपास पुर्ण.

## उलट तपासणी

## आरोपीकरिता श्री. आर. एन. खेडकर वकील

२. आरोपी हे तुटक भावकीतील आहेत. आरोपी व आमची जमीन शेजारी शेजारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी जमिन माझ्याकडून विकत घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्यामध्ये शेतजमीनच्या ५ गुंठे क्षेत्रावरुन वाद आहे. माझ्या पत्नीने सन २०१४ मध्ये आरोपींमध्ये गु र क्र. २४/२०१४ नुसार फिर्याद दाखल केली अगर कसे याची मला माहिती नाही. घटनास्थळी चौक असून त्या ठिकाणाहून चार ठिकाणी रस्ता जातो. घटनास्थळी बरेच लोक राहत असतील. घटनास्थळी एस टी चा थांबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाच्या थोडया अंतरावर कृषी सेवा केंद्र आहे. आमचे घर एकनाथवाडी रोडला आहे. घटनास्थळापासून आमचे घर अंदाजे ५०० मीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ते ३ हे वेगवेगळे राहतात.

३. मी पोलिसांना जबाब देताना घटना मुंगुसवाडे ते एकनाथवाडी जाणारे रोडवरील कमानीजवळ घडली, आम्हाला कलमा ऐकू आला, आम्ही आरोपी आजिनाथला व आरोपी क्र. २ ते ७ यांना समजावून सांगण्यासाठी गेलो व आरोीप क्र. २ ते ७ तेथे शिवीगाळ करत आल्याचे सांगितले होते परंतु तसा मजकूर जबाबामध्ये नमुद नाही त्याचे कारण मी सांगू शकत नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझी पत्नी आणि मुलाने विचार करुन दुस–या दिवशी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपुर्ण मजकूर खोटा नमुद केलेला आहे, आरोपींनी आम्हाला कोणतीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दवाखान्यात गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, लोखंडी गज आर्टीकल अ मी पोलिसांना दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

...उलटतपास पुर्ण.

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

दिनांकः ०८.०८.२०२५.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2025.08.08 17:34:07 +0530

**(रविकिरण सपाटे )**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

पाथर्डी जि. अहमदनगर.